| | | |
|---|---|---|
| MHAH150018132022 | केस दाखल दिनांक | ११/१०/२०२२ |
| | केस नोंदणी दिनांक | ११/१०/२०२२ |
| | केस निकाल दिनांक | ११/०९/२०२५ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०२ १० ३० |
| | निशाणी क्र. | ३५ |

भाग अ

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, नेवासा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी - ए.एन.सरक)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७९९/२०२२

(नेवासा पोलिस स्टेशन गु.र.क्र. I-१७८/२०२२)

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत नेवासा पोलीस स्टेशन,<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर |
| प्रतिनिधीत्व | | सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे |
| आरोपी | १. | विल्यम विजय गायकवाड,<br>वय - २६ वर्षे, व्यवसाय – फोटोग्राफी, |
| | २. | मनिष संजय गायकवाड,<br>वय -२७, व्यवसाय – मोबाईल शॉपी,<br>रा. शिंगणापुर, ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| | ३. | शामुवेल रामभाऊ गायकवाड,<br>वय - ५०, व्यवसाय – मजुरी,<br>आरोपी क्र. १ ते ३ रा. नेवासा खुर्द<br>ता. नेवासा, जि. अहमदनगर. |
| प्रतिनिधीत्व | | आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. जे.बी. इनामदार |

भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | ०७/०३/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | ०७/०३/२०२२ |
| दोषारोप दाखल दिनांक | ११/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १५/०२/२०२४ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | ०३/०१/२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | -- |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | ११/०९/२०२५ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 16:59:23 +0530

<u>आरोपींचा तपशिल</u>

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विल्यम विजय गायकवाड | सी.आर.पी.सी. कलम ४१(अ) प्रमाणे नोटीस | -- | भा.द.वी.कलम १४३, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| २. | मनिष संजय गायकवाड | वरीलप्रमाणे | -- | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ३. | शामुवेल रामभाऊ गायकवाड | वरीलप्रमाणे | -- | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

<u>न्यायनिर्णय</u>

**(घोषित दिनांक ११/०९/२०२५)**

प्रस्तुत खटला आरोपी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयेचे गुन्हयासाठी चालविण्यात आला (येथून पुढे भा.द.वी असे संबोधण्यात येईल).

<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे -</u>

२) घटना दिनांक ०७/०३/२०२२ रोजी रात्री २.०० वाजण्याच्या सुमारास खडका फाटा टोलनाका येथे घडली. घटनेच्या दिवशी आरोपी क्र. १ ते ३ व इतर ४ अनोळखी इसम यांनी गैर कायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी चालवत असलेली ट्रॅव्हल गाडी क्र. MH-29-BE-0999 हीस पुढे जाण्यास प्रतिबंध केला व फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. म्हणुन, फिर्यादीने प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे.

३) या फिर्यादीवरून नेवासा पोलीस स्टेशन, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे गु.र.क्र.१७८/२०२२ नोंद करण्यात आला. त्याचा तपास पो.ना/२२३७ श्री. एन.एन. भताने यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला व वैदयकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४) मी आरोपी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द (निशाणी ८) लगत दोषारोप निश्चित केला. सदरचे दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगितला असता आरोपींनी त्यांच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व त्यांच्याविरुध्द खटला

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 16:59:33 +0530

चालविण्याची विनंती केली.

५) आरोपींविरुध्द सदर गुन्हयाच्या अनुषंगाने दोषपुर्ण पुरावा अभिलेखावर आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये (निशाणी ३२ ते निशाणी ३४ वर) निवेदन नोंदवण्यात आले.

६) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | विचारार्थ मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०७/०३/२०२२ रोजी रात्री ०२.०० वाजण्याच्या सुमारास मौजे खडका फाटा टोलनाका, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे आरोपी क्र.१ ते ३ व अज्ञात चार अनोळखी इसम यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना इजा पोहोचवण्याच्या उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवली असे अभियोग पक्षाने शाबित केले आहे काय ? | नाही. |
| २. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना रस्त्यात अडवुन मारहाण करून इजा पोहोचवली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का? | नाही. |
| ३. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन इजा पोहोचवली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का? | नाही. |
| ४. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांचा उद्देशपुर्वक शिवीगाळ करुन अपमान करुन त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ५. | वरील दिवशी, ठिकाणी, वेळी आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का? | नाही. |
| ६. | काय आदेश ? | आरोपी क्र.१ ते ३ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 16:59:42 +0530

तोंडी व कागदोपत्री पुरावा

७) अभियोग पक्षातर्फे दोषसिध्दतेसाठी एकुण चार साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी साक्षीदार क्र. १ बाबासाहेब रामनाथ आढाव (घटनास्थळ पंच/नि.१२),

साक्षीदार क्र. २ राहुल बाबुलाल गुंजाळ (घटनास्थळ पंच/नि.१५), अ.सा.क्र.३ सुखदेव बापु सटाले (फिर्यादी/नि. २५) व अ.सा.क्र.४ पो.हे.कॉ/२२३७ श्री. एन.एम.भटाने (तपासी अंमलदार/नि.२९) इत्यादींची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षातर्फे तोंडी पुराव्या व्यतिरिक्त फिर्याद, तपास आदेश (नि.३०) आणि घटनास्थळ पंचनामा (नि.३१) इत्यांदी कागदोपत्री पुराव्याचा आधार घेतला.

## युक्तिवाद

८) अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.के.सोनवणे आरोपींतर्फे विधिज्ञ श्री जे.बी.इनामदार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ ते ५-

९) याकामी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे स्वरुप पाहता पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ५ वर एकत्रित विश्लेषण करणे सोयीचे होणार असल्यामुळे सदर मुद्दे विश्लेषणाकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

१०) अभियोग पक्षातर्फे एकुण ४ साक्षीदार तपासले त्यापैकी अ.सा.क्र. १ बाबासाहेब (नि. १२) व अ.सा.क्र. २ राहुल (नि.१४) हे घटनास्थळ पंच असुन त्यांनी त्यांचे सरतपासात असे कथन केले आहे की, त्यांना पोलिसांनी कुठेही बोलावले नव्हते. पोलिस खडकाफाटा येथील के.टी.संगम टोल नाक्यावर आले होते तिथे त्यांनी त्यांची सही घेतली होती. त्यांनी जप्ती पंचनाम्यावरील सही ओळखली परंतु, मजकुराबाबत माहित नसल्याचे कथन केले. त्यांच्या पुराव्यावरून घटनास्थळ पंचनामा शाबीत होत नाही.

११) अ.सा.क्र. ३ सुखदेव (नि. २५) हा फिर्यादी असुन त्याने त्याचे सरतपासात असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखत नाही. घटना साधारण २ ते ३ वर्षांपुर्वी रात्री २.०० वाजेच्या दरम्यान नेवासा फाटा येथे घडली होती. घटनेच्या दिवशी त्याचे व आरोपींचे किरकोळ वाद झाले होते. या व्यतिरीक्त काहीही झालेले नव्हते. वादाबाबत त्याने फिर्याद दिली होती. त्याने निशाणी २६ वरील फिर्यादीवरील सही मान्य केली परंतु, मजकुराबाबत माहित नसल्याचे कथन केले. याउलट सदर साक्षीदाराने अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात असे मान्य केले की, त्याचे व आरोपींचे आपसात न्यायालयाबाहेर मिटलेले आहे

१२) अभियोग पक्षाचा पुरावा विचारात घेता, साक्षीदार क्र. ३ सुखदेव हा

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 16:59:51 +0530

फिर्यादी असुन त्यांनी उलटतपासादरम्यान मान्य केले की, आरोपी व त्यांचे आपसात न्यायालयाबाहेर मिटलेले आहे. त्यामुळे त्याला पुढे केस चालवायची नाही. मुळ फिर्यादीने (निशाणी २८) वर जादा लेखी व तोंडी पुरावा देणे नाही अशी पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केलेला आहे. साक्षीदार क्र.१ व ३ यांचा पुरावा व पुरसिस विचारात घेता गुन्हयाचे दायित्व आरोपींवर येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. फिर्यादी व साक्षीदार यांना आरोपी क्र.१ ते ३ यांनी आपसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदार यांना रस्त्यात अडवुन लाथाबुक्कयांनी मारहाण करून इच्छापुर्वक इजा पोहोचवली तसेच फिर्यादी यांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली हे गुन्हयाचे घटक आरोपींविरुध्द निसंशयितपणे शाबित होत नाहीत.

१३) अ.सा.क्र. ४ पो.हे.कॉ. २२३७/श्री. एन.एम.भताने (नि. २९) हे तपासी अंमलदार असुन त्यांनी अभियोग पक्षास सुसंगत अशी साक्ष दिली. औपचारिक साक्षीदारांचे पुरावे हे मुख्य साक्षीदाराच्या साक्षीस सहाय म्हणुन लक्षात घ्यावे लागतील मात्र दाखल पुराव्यावरुन गुन्हा सिध्द होत नसेल तर औपचारिक पुराव्याला महत्व उरत नाही.दाखल पुराव्यावरुन आरोपींना दोषी धरता येणार नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.६</u>-

१४) वरील चर्चेबरोबर अभियोग पक्षास आरोपी क्र.१ ते ३ वरील दोषारोप सबळ पुराव्याआधारे शाबित करता आलेले नाहीत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. फिर्यादीने अभियोग पक्षाच्या कथनांस सहाय्य केलेले नाही. फिर्यादीने आरोपी व त्याचेमध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे त्याने पुर्वीच्या जबाबाच्या विसंगत जबाब दिला असावा असा निष्कर्ष काढणे या ठिकाणी उचित होईल. त्यामुळे फिर्यादीस शिक्षा करणे न्यायिक दिसुन येत नाही. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द होवून स्वतंत्र होणेस पात्र आहेत. तसेच प्रस्तुत न्यायनिर्णयाविरुध्द अपील झाले तर त्याकामी वरिष्ठ न्यायालयात हजर होणेसाठी आरोपींनी जामीन बंधपत्र फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार देणे योग्य होणार आहे. सबब, मुद्दा क्र.६ च्या निष्कर्षात मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 17:00:01 +0530

<u>अंतिम आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, ३४१, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | आरोपी क्र.१ ते ३ यांनी दिलेला जामीन कदबा व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो. |
| ३. | आरोपी क्र.१ ते ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये अपील कालावधीसाठी व अपील दाखल झाल्यास त्यामध्ये विनाविलंब हजर राहण्याच्या हमीसाठी प्रत्येकी रक्कम रू.७,५००/- चा नवीन वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा आजपासून सात दिवसांच्या आत सादर करावा. |
| | (सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.) |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 17:00:08 +0530

दिनांक – ११/०९/२०२५
ठिकाण - नेवासा

**(ए.एन. सरक)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा.

भाग क

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | बाबासाहेब रामनाथ आढाव | घटनास्थळ पंच/नि. १२ |
| २. | राहुल बाबासाहेब गुंजाळ | घटनास्थळ पंच/नि. १४ |
| ३. | सुखदेव बापु सटाले | फिर्यादी/नि. २५ |
| ४. | पो.हे.कॉ/२२३७ एन.एम.भताने | तपासी अंमलदार/नि. २९ |

ब. आरोपींतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | |

क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

अभियोग पक्ष/ आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| १३ व १५ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस /अ.सा.क्र.१ व अ.सा.क्र. २ |
| २६ | फिर्यादीवरील सहीस/अ.सा.क्र. ३ |
| ३० | तपास आदेश/अ.सा.क्र. ४ |
| ३१ | घटनास्थळ पंचनामा/अ.सा.क्र. ४ |

ब. आरोपींतर्फे पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

क. न्यायालयीन पुरावा

| निशाणी क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2025.09.12 17:00:15 +0530

दिनांक – ११/०९/२०२५
ठिकाण - नेवासा

(ए.एन. सरक)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), नेवासा.